**कृपया प्रसिध्दीसाठी -** **25 जून 2010**

**काँग्रेस सरकारने जनतेच्या विरोधात युद्ध पुकारले - राम नाईक**

**मुंबई, शुक्रवार :** "संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने जनतेच्या विरोधात युद्धच पुकारले आहे. सीएनजी आणि पीएनजी गॅसच्या दरवाढीच्या पाठोपाठ आता केरोसिन, एलपीजी, डिझेल व पेट्रोलचीही दरवाढ झाल्याने सामान्य माणसाच्या डोक्यावर जणू आभाळच कोसळले आहे. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह पेट्रोलियम पदार्थांच्या किंमतीबाबत सुसंगत धोरण ठरविण्यात सपशेल अपयशी झाले आहेत", अशी प्रतिक्रिया माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी आज मुंबईत प्रसिद्ध केलेल्या पत्रकात दिली आहे.

"गेली सहा वर्षे या सरकारने तीन समित्या नेमल्या. तरीही आता धड निर्णय नाही. पेट्रोलच्या किंमतीवरील नियमन हटविले, तर डिझेलबाबत अजूनही निर्णय नाही. वाढलेल्या किंमतींचे ओझे कमी करण्यासाठी अबकारी करात सवलत देता आली असती. तसे न करता राज्यसरकारांनी विक्रीकर कमी करावा असा केंद्र सरकारचा उपदेश म्हणजे हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवण्याचा प्रकार आहे. 'आम आदमी' ला वेठीला धरायचा विडाच जणू सरकारने उचलला आहे." अशा शब्दात श्री. नाईक यांनी आपली नाराजी व्यक्त केली.

"पेट्रोल, डिझेल, एलपीजी व रॉकेलच्या किंमतीत झालेल्या जबरदस्त दरवाढीमुळे आधीच सुरु झालेले किंमतवाढीचे दुष्ट चक्र अधिकच गतीमान होईल. जनतेने जागे होऊन तीव्र आंदोलन उभारल्याखेरीज आता तरुणोपाय नाही," असेही श्री. नाईक म्हणाले.

**(कार्यालय सचिव)**